# दिनांक 23/03/2025

**1.** रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 21/03/2025 रोजी 22:00 वा च्या सुमारास मौजे कोर्लई पेट्रोलपंपाजवळ रेवदंडा मुरुड रोडवर, मुरूड येथे दिनांक 21/03/2025 रोजी महिला फिर्यादी रा. बोर्ली, ता.मुरुड यांचे पति हे रेवदंडा येथुन बोर्ली येथे घरी येत असताना कोर्लई गावाचे हद्दीत पेट्रोलपंपाजवळ रेवदंडा मुरुड रोडवर आलेवेळी रेवदंडा बाजुकडुन बोर्ली बाजुकडे जाणारी एसटी बस क्र.एम.एच 20 बी एल 3242 वरील आरोपित चालक याने त्याच्या ताब्यातील एसटी ही भरधाव वेगात चालवून रस्त्याचे बाजुले चालणारे फिर्यादी यांचे पति यांस पाठीमागुन ठोकर मारून अपघात करुन सदरच्या अपघातामध्ये फिर्यादी यांचे पति जखमी श्री. गजानन भोबु यांस वैदयकीय उपचाराकरीता न नेता तेथून पळून गेला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी दिनांक व वेळ 22/03/2025 रोजी 04:05 वा च्या सुमारास अटक करण्याती आली आहे.

याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे गुरनं. 35/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184, भारतीय न्याय सहीता 2023 चे कलम 106(1), 281, 125(a),125(b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई गोविंद मढावी हे करीत आहेत.

**2.** नेरळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 22/03/2025 रोजी 08:15 वा च्या सुमारास मौजे नेरळ गावचे हद्दीत दामत रेल्वे गेटचे जवळ, पेशवाई रोडवर ता.कर्जत येथे आरोपीत एकूण 3,00,000/- रुपये व किमतीचे गोवंशीय जनावरे कत्तल करण्याचे उददेशाने, कोठूनतरी चोरून आणून त्यांना चारापाण्याची व्यवस्था न करता, दाटीवाटीने, क्रुरपणे बांधुन कोंडुन टेम्पो मध्ये भरून स्वत; टेम्पो चालवित घेवून जात असताना मिळून आला. सदर गुन्ह्यातील आरोपी दिनांक व वेळ 22/03/2025 रोजी 13:51 वा च्या सुमारास अटक करण्याती आली आहे.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे गुरनं.51/2025, भा.न्या.सं.2023 कलम 303(2)सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा अधिनियम सन 1995 चे कलम 5(अ)चे उल्लंघन 9 सह प्राण्यांना क्रुरतेने वागवणेस प्रतिबंध करणेबाबत अधिनियम 1960 चे कलम 11,(1),(घ) (ड),(ज), प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/सचिन वाघमारे हे करीत आहेत.

**3.** खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 22/03/2025 रोजी 02:00 वा च्या सुमारास मौजे आडोशी गावचे हद्दीत मुंबई पुणे एक्सप्रेस हायवे खोपोली, ता.खालापूर येथे अज्ञात वाहनावरील अज्ञात चालकाने त्याचे ताब्यातील अज्ञात वाहन हे अतिवेगाने, हयगयीने, अविचाराने, रस्त्याचे

परिस्थीतीकेडे दुर्लक्ष करून बेदरकारपणे वाहन चालवुन अनोळखी फिरस्ता पादचारी इसम अंदाजे वय 45 ते 50 वर्षे, यास ठोकर मारून अपघात करून अपघातात पादचारी अनोळखी इसमास लहान मोठया स्वरूपाच्या गंभीर दुखापती करून त्याचे मरणास कारणीभुत होवुन अपघात ठिकाणी न थांबता वाहनासह पळुन गेला.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं. 86/2025, बीएनएस 2023 चे कलम 106(1), 281, 125(अ), 125(ब), मो.वा.का.क.184, चे कलम 134 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/ श्री कृष्णा निकाळजे हे करीत आहेत.

**4.** कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 21/03/2025 रोजी 20:00 वा च्या सुमारास मौजे मेचकरवाडी, पो.आगिवले, ता.कर्जत येथे फिर्यादी रा.मेचकरवाडी, पो.आगिवले, ता.कर्जत व आरोपीत यांच्यात यापुर्वी जमिनीवरुन वाद-विवाद सुरु आहेत. फिर्यादी हे त्यांच्या घरासमोर बसले असताना आरोपीत क्रं.1 रा.मोग्रज, ता.कर्जत यांनी फिर्यादी यांच्या डाव्या कानावर दगड मारुन दुखापत केली तसेच आरोपीत क्रं.2 यांनी फिर्यादी हाताबुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळी केली व जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं. 85/2025, भारतीय न्याय संहीता कलम 118(1), 115(2) 352, 351(2), 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पो.हवा/लालासाहेब तोरवे हे करीत आहेत.

**5.** महाड (एम.आय.डी.सी.) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 22/03/2025 रोजी 10:30 वा च्या सुमारास फिर्यादी यांचे आई वडिलांचे घरातून, येथे कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांच्या दोन मुली यांना कोणीतरी अज्ञात ईसमाने फिर्यादी यांचे आई वडिलांचे रखवालीतून संमतीशिवाय फूस लावून पळवून नेले.

याबाबत महाड (एम.आय.डी.सी.) पोलीस ठाणे गुरनं. 32/2025, भारतीय न्याय संहिता 2023 137(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री समेल सुर्वे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 22.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 225 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,20,450/-रुपये इतका दंड आकारला आहे.